# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** यवतमाळ **P.S.(ठाणे):** वणी **Year (वर्ष):** 2023

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0217 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/02/2023 01:37 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** रविवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 26/02/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 26/02/2023
**Time From (वेळेपासून):** 17:33 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:38 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 27/02/2023 **Time (वेळ):** 01:17 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 005 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/02/2023 01:17 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** वणी शहरातील नांदेपेरा,रोडवरील हटेल शिवार , वणी ,वणी , 445304

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** दिलीप रामदास भोयर

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1980 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

अॅ.क.ब्युरो, यवतमाळ
दिनांक:— २६/०२/२०२३

## फिर्याद

मी दिलीप रामदास भोयर, वय ४३ वर्ष, धंदा शेती, रा. वसंत गंगविहार, शिंपी समाज भवन जवळ, गौरक्षण रोड वणी ता वणी जिल्हा यवतमाळ नमुद पत्यावर माझे कुटुंबासह राहतो. श्री.कवडे, भुमापक उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय वणी हे मला माझे पत्नीचे नांवे मौजा पुरड (नेरड) येथील शेत सर्वे नंबर २२ च्या शेतीचे मोजणी करून शेताची हद्द कायम करून देण्याकरीता १२,०००/— रुपये लाचेची मागणी केल्याने, मी त्यांचेविरुध्द लाच मागणीची तक्रार दिनांक २५/०२/२०२३ रोजी कॅम्प भांदेवाडा वणी येथे येउन पोलीस निरीक्षक विनायक कारेगांवकर यांचे समक्ष लेखी तक्रार दिली, ती खालील प्रमाणे आहे.

## तक्रार

प्रती,

मा.पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतीबंधक विभाग,यवतमाळ.

अर्जदार :— श्री. दिलीप रामदास भोयर, वय ४३ वर्ष, धंदा शेती, रा. वसंत गंगविहार, शिंपी समाज भवन जवळ,. गौरक्षण रोड वणी ता वणी जिल्हा यवतमाळ मो.क्र ९४२१७७३७७१/८३९०६७८१७२

महोदय,

वरील लेखी तक्रार सादर करतो की, मी वरील पत्यावर माझे कुटूंबासह राहत असुन माझे शिक्षण बि.ए पर्यंत झालेले आहे. मला मराठी व हिंदी भाषा लिहीता, वाचता येते. मी माझी पत्नी श्रीमती. सुकेशनी दिलीप भोयर हीचे नांवे सन २०२१ मध्ये श्री.गोविंदा महादेव भटारकर व इतर पाच रा. पुरड (ने) ता वणी जि.यवतमाळ यांचे कडुन मौजा पुरड (नेरड) येथे शेत सर्वे नंबर २२ ची तिन एकर शेती खरेदी केली, असुन सदर शेतीच्या मोजणी करीता मी अंदाजे माहे ऑक्टोंबर २०२१ मध्ये उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय वणी येथे अर्ज दाखल केला. यानंतर माहे फेब्रुवारी २०२२ मध्ये श्री. कवडे, भुमापक यांनी सदर शेतीची मोजणी केली व त्यांनी मला सांगीतले की, तुमच्या शेतीचा गटबदल झालेला आहे, सदरची दुरूस्ती ही तुम्हाला करून तशी दुरूस्तीची नविन मोजणी शिट बनावावी लागणार त्यासाठी तुमच्या शेतीची हद्द कायम करून देतो, त्याकरीता तुम्ही मला बारा हजार रूपये दया लागतील असे म्हटले त्यावर मी त्यांना म्हटले की, मी मोजणी करीता लागणारे तिन हजार रूपये शासकीय शुल्क भरलेला आहे आता हे कशाचे बारा हजार रूपये त्यावर श्री.कवडे, भुमापक यांनी हे काम कठीण असुन ते मी फक्त तुम्हालाच करून देत आहे, त्याचा हा खर्चपाणी आहे, असे म्हटल्यावर मी तेथुन निघुन आलो, त्यानंतर पावसाळा सुरू झाल्याने मी शेतीचे व इतर कामात व्यस्त झाल्याने मोजणीचे काम करण्याकडे लक्ष दिले नाही. यानंतर मी दिनांक १८/०२/२०२३ रोजी शेतीचे मोजणी करून हद्दकायम करून घेण्याकरीता श्री. कवडे, भुमापक यांना फोन केला परंतु त्यांनी फोन घेतला नाही, त्याच दिवशी श्री.कवडे यांनी मला त्यांचे मो नं ९०२२९५९४९५ वरून फोन करून तुमचे शेतीच्या मोजणीची हद्द कायमचे काम करून देतो, तुम्ही नविन मोजणीचा अर्ज काही करू नका मी तुमचे काम करून देतो फक्त मी सांगीतल्या प्रमाणे बारा हजार रूपये घेउन या असे म्हटले व फोन ठेउन दिला. तरी श्री.कवडे, भुमापक उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय वणी हे मला माझे पत्नीचे नांवे मौजा पुरड (नेरड) येथील शेत सर्वे नंबर २२ च्या शेतीचे मोजणी करून शेताची हद्द कायम करून देण्याकरीता १२,०००/— रू लाचेची मागणी करीत आहेत, माझी त्यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी त्यांचे विरुध्द लाच मागणीची तक्रार देत असुन, श्री.कवडे, भुमापक यांचेशी माझे कोणतेही वैर नाही तसेच देण्या घेण्याचा उसणवारीचा अथवा शासकीय शुल्क जमा करण्याचा कोणताही व्यवहार आमचे मध्ये नाही. तरी श्री. कवडे, भुमापक यांनी मला लाचेची मागणी केल्यास व लाच रक्कम स्विकारल्यास त्यांचे वर कायदेशिर कारवाई करण्यात यावी, ही विनंती." अशी तक्रार दिली.

दिनांक २५/०२/२०२३ रोजी मी जगन्नाथ महाराज मंदीर भांदेवाडा वणी येथे येउन पोलीस निरीक्षक श्री. विनायक कारेगांवकर, पंच व पथकाची भेट घेतली. पोलीस निरीक्षक श्री.कारेगांवकर यांनी दिनांक २५/०२/२०२३

Scanned with CamScanner

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वसंत गंगविहार,शिंपी समाज भवन जवळ,गौरक्षण रोड वणी,वणी ,वणी,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वसंत गंगविहार,शिंपी समाज भवन जवळ,गौरक्षण रोड वणी,वणी ,वणी,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.): 91-9421773771

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कृष्णा महादेवराव कवडे | | | 1. प्लट नं 20,वडगांव आर्णी रोड यवतमाळ, एकलव्य नगर,यवतमाळ , यवतमाळ,अवधूतवाडी,यवतमाळ, महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

थोडक्यात हकीकत सदर गुन्हयातील आरोपी लोकसेवक कृष्णा महादेवराव कवडे, वय 50 वर्ष, पद नगर भुमापक लिपीक नेमणुक उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय यवतमाळ जिल्हा यवतमाळ यांनी आपले लोकसेवक या पदाचा दुरूपयोग करून आपले कायदेशीर कर्तव्य पार न पाडता दिनांक 25/02/2023 रोजी पडताळणी दरम्यान पंचासमक्ष तक्रारदार श्री. दिलीप रामदास भोयर यांना त्यांचे पत्नीचे नांवे मौजा पुरड (नेरड) येथील शेत सर्वे नंबर 22 च्या शेतीचे मोजणी करून शेताची हद्द कायम करून देण्याकरीता पंचासमक्ष तडजोडीअंती 10,000/- रू लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. यानंतर दिनाक 26/02/2023 रोजी 17/33 वा ते 17/38 वाजताचे सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक कृष्णा महादेवराव कवडे, नगर भुमापक लिपीक यांनी तक्रारदार श्री. दिलीप रामदास भोयर यांचे कडुन पंचासमक्ष 10,000/- रूपये लाच रक्कम वणी शहरातील नांदेपेरा रोड वरील हटेल शिवार येथे स्विकारली.

13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Pradip Govinda Shiraskar(I (Inspector)) / POBN73118 or (किंवा)

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):
Rank (पद):
No.(क्र.): to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

रोजी माझे तक्रारीची पडताळणी करणेकरीता मा.तहसिलदार, तहसिल कार्यालय यवतमाळ येथुन पंच क्र.१) श्री. विशाल अमृतराव महल्ले, महसुल सहायक व पंच क्र.२) श्री.विष्णु भास्करराव डोळसे, महसुल सहायक हे दोन शासकीय पंच त्यांचे सोबत घेउन आलेत, यानंतर पोलीस निरीक्षक श्री. कारेगांवकर यांनी दोन्ही पंचाना माझी व मला पंचाची ओळख करुन दिली. त्यांना मी तोंडी तकार सांगीतली व मी त्यांचे समक्ष माझी तक्रार लिहीली व दोन्ही पंचांना वाचण्यास दिली, माझी तोंडी व लेखी तक्रारीतील मजकुर एकच असल्याची खात्री झाल्याने दोन्ही पंचानी व पोलीस निरीक्षक श्री.कारेगांवकर यांनी तक्रारीवर स्वाक्षरी केली. पोलीस निरीक्षक श्री.कारेगांवकर यांनी मला सांगितले की, लोकसेवक यांची प्रत्यक्ष भेट घेऊन कामासंबधाने चर्चा करावी. यावेळी पडताळणी कार्यवाही दरम्यान होणारे संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरव्दारे सॅनडिस्क कंपनीचे ३२ जी.बी.मेमरी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत होणार असल्याचे सांगीतले. तसेच व्हॉईस रेकॉर्डरचे प्रात्यक्षीक सुध्दा करून दाखविण्यात आले. सविस्तर कारवाई दिनांक २५/०२/२०२३ रोजीचे पडताळणीपुर्व पंचनामा प्रमाणे करण्यात आली.

यानंतर श्री.कवडे,भुमापक यांनी मला भेटण्याकरीता भुमी अभिलेख कार्यालया जवळ बोलाविल्याने माझे विनंतीवरुन तक्रारीची पडताळणी दिनांक २५/०२/२०२३ रोजी करण्याचे ठरले, पोलीस निरीक्षक श्री.कारेगांवकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे शर्टाचे खिश्यामध्ये ठेवला, ती वेळ १७:४२ वाजताची होती. मी, पंच क्र.१ यांचेसह माझे चारचाकी वाहनाने विठठ्लवाडी येथील मामाचे पानठेल्याजवळ भेटण्याकरीता गेलो व श्री.कवडे, भुमापक यांची भेट घेतली व त्यांचेशी माझे कामासंबंधाने चर्चाकेली चर्चेदरम्यान श्री.कवडे, भुमापक यांनी मला माझे पत्नीचे नांवे मौजा पुरड (नेरड) येथील शेत सर्वे नंबर २२ च्या शेतीचे मोजणी करून शेताची हद्द कायम करून देण्याकरीता पंचासमक्ष तडजोडीअंती १०,०००/— रू लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. यानंतर मी, पंच क्र.१ असे पोलीस निरीक्षक श्री.कारेगांवकर यांचे जवळ परत आलो असता पोलीस निरीक्षक श्री. कारेगांवकर यांनी माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर घेउन बंद केला, ती वेळ १८:०८ वाजताची होती. यानंतर आम्ही सर्व पडताळणी पथकाजवळ परत आलो. यानंतर विचारल्यावरून मी व पंच क्र.१ यांनी घडलेली सविस्तर हकीकत पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री.कारेगांवकर यांना सांगितली. यानंतर मी, पंच पथकातील अधिकारी व कर्मचारी लेखी कारवाई करणेकरीता शासकीय विश्राम गृह चंद्रपुर येथे आलो, यानंतर पो.नि. कारेगांवकर यांचे सुचनेवरून पुढील लेखी कारवाई करण्यात आली, व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत संभाषणाची ट्रान्सक्रिप्ट माझे मदतीने तयार करण्यात आले. श्री.कवडे, भुमापक यांनी मला शेतीची हद्दकायम करून देतो तसेच लाच रक्कम दिनांक २६/०२/२०२३ रोजी घेउन बोलाविल्याचे स्पष्ट झाले, सविस्तर कारवाई दिनांक २५/०२/२०२३ रोजीचे पडताळणी पंचनामा प्रमाणे करण्यात आली.

यानंतर दिनांक २६/०२/२०२३ रोजी पोलीस निरीक्षक श्री.कारेगांवकर, पथकातील कर्मचारी, पंच व मी शासकीय विश्राम गृह चंद्रपुर येथुन वेकोली विश्राम गृह भालर येथे आलो व माझे विनंती वरून दिनांक २६/०२/२०२३ रोजी सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे ठरले. यानंतर पोलीस निरीक्षक श्री.कारेगांवकर यांनी सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या श्री.कवडे, भुमापक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यास डावा हात स्वत:चे डोक्यावरुन वारंवार फिरवावा असा ईशारा सांगीतला. यानंतर पोलीस निरीक्षक श्री. कारेगांवकर यांनी सिलबंद असलेले मेमरी कार्डचे पाकीट माझे व पंचासमक्ष हजर केले, यानंतर पाकीटमधुन सॅनडिस्क कंपनीचे ३२ जी.बी.मेमरी कार्ड काढले व व्हाईस रेकॉर्डर मध्ये ३२ जी.बी. मेमरी कार्ड माझे व पंचासमक्ष टाकले. सविस्तर कारवाई दिनांक २६/०२/२०२३ रोजीचे सापळ्यापुर्व पंचनामा प्रमाणे करण्यात आली.

यानंतर मी, पोलीस निरीक्षक श्री.कारेगांवकर, कर्मचारी व पंच, असे वेकोली विश्राम गृह भालर येथुन वणी येथील शिवार हॉटेल जवळ आलो तेथुन पोलीस निरीक्षक कारेगांवकर यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे शर्टाचे खिश्यामध्ये ठेवला, ती वेळ १७:३३ वाजताची होती. व मी आणि पंच क्र.१ असे पायी पायी शिवार हॉटेल मध्ये गेलो असता श्री. कवडे,भुमापक यांची भेट घेतली व चर्चा केली. श्री. कवडे, भुमापक यांनी मला हाताचे इशाऱ्याने लाचेची मागणी केली तेव्हा मी त्यांना माझे फुलपॅन्टचे उजव्या खिशातील लाच रक्कम १०,०००/— रूपये उजव्या हाताने काढुन दिली असता श्री.कवडे, भुमापक यांनी लाचेची रक्कम त्यांचे डाव्या हाताने स्विकारुन स्वत:चे जिन्स पॅन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवली. तेव्हा मी हॉटेलचे बाहेर येवुन माझे डोक्यावर डावा हात फिरवुन पुर्वनियोजीत ईशारा सापळा पथकास केला. त्यावरून पोलीस निरीक्षक श्री.कारेगांवकर व पथकातील

Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) :

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.** (आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस स्टेशन, ऑफीसर
पो.स्टे. वणी, जि.यवतमाळ

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Pradip Govinda Shiraskar
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN73118



Scanned with CamScanner

कर्मचारी यांनी तेथे लगेच येऊन श्री.कवडे, भुमापक यांचे दोन्ही हात पकडुन त्यांना ताब्यात घेतले व माझेजवळील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेउन तो १७:३८ वाजता बंद केला. यानंतर पोलीस निरीक्षक श्री.कारेगांवकर यांनी स्वताचा परीचय देउन श्री.कवडे,भुमापक यांना कारवाईबाबत माहिती दिली आणि त्यांना त्यांचे संपुर्ण नांव, पद व पत्ता विचारले असता त्यांनी "कृष्णा महादेवराव कवडे, वय ५० वर्ष, पद नगर भुमापक लिपीक नेमणुक उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय यवतमाळ जिल्हा यवतमाळ रा. प्लॉट नं २०/०१ एकलव्य नगर वडगांव आर्णी रोड यवतमाळ ता जिल्हा यवतमाळ व दिनांक २५/१०/२०२२ ते दिनांक ३०/१२/२०२२ पर्यंत प्रतिनियुक्तीवर उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय वणी येथे होतो" असे सांगीतले. त्यांनतर पोलीस निरीक्षक श्री.कारेगांवकर यांचे सुचनेप्रमाणे श्री.कृष्णा कवडे, नगर भुमापक लिपीक यांचे हात व पॅन्ट अल्ट्राव्हॉयलेट लॅम्पचे प्रकाशात चेक केले व श्री.कवडे यांचे कडुन माझे कामासंबंधाने आवश्यक कागदपत्रे पंचासमक्ष जप्त करण्यात आले, याबाबत सविस्तर कार्यवाही दिनांक २६/०२/२०२३ चे सापळा कार्यवाही पंचनामा प्रमाणे करण्यात आली आहे.

तरी कृष्णा महादेवराव कवडे, नगर भुमापक लिपीक यांनी दिनांक २५/०२/२०२३ रोजी पडताळणी दरम्यान मला माझे पत्नीचे नांवे मौजा पुरड (नेरड) येथील शेत सर्वे नंबर २२ च्या शेतीचे मोजणी करून शेताची हद्द कायम करून देण्याकरीता पंचासमक्ष तडजोडीअंती १०,०००/– रू लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. वरून दिनांक २६/०२/२०२३ रोजी चे १७:३३ वा ते १७:३८ वाजताचे सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक कृष्णा महादेवराव कवडे, नगर भुमापक लिपीक यांनी माझे कडुन पंचासमक्ष १०,०००/– रूपये लाच रक्कम वणी शहरातील नांदेपेरा रोड वरील हॉटेल शिवार येथे स्विकारली. त्यावरुन आरोपी लोकसेवक कृष्णा महादेवराव कवडे, वय ५० वर्ष, नगर भुमापक लिपीक नेमणुक उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय यवतमाळ जिल्हा यवतमाळ यांचेविरूध्द कायदेशीर कारवाईस्तव तक्रार देत आहे.

त्यावरुन आरोपी लोकसेवक कृष्णा महादेवराव कवडे, वय ५० वर्ष, नगर भुमापक लिपीक नेमणुक उप अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय यवतमाळ जिल्हा यवतमाळ यांचेविरूध्द कायदेशीर कारवाईस्तव तक्रार देत आहे.

समक्ष

( विनायक कारेगांवकर )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,यवतमाळ

सही

दिलीप रामदास भोयर

Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner